

मडगावमधील जुन्या इमारतीचा भाग कोसळला » पान ४ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



पंतला अखेर विजयाची चव; गुजरातचा पराभव » पान ४ वर

वेर्णा, शनिवार, २४ मे २०२५ । पाने ४ । ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 261 | Verna, | facebook.com/dainikherald | Saturday 24 May 2025 | Pages 4 | ₹ 4

# पावसाचा मारा कायम; ‘ऑरेंज अलर्ट’ !

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. २३ : राज्यात गेल्या तीन दिवसांपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे गोवा पुन्हा एकदा जलमय झाला आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय हवामान खात्याने २४ आणि २५ मे २०२५ रोजी ‘ऑरेंज अलर्ट’ जारी करत उत्तर व दक्षिण गोव्यात अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.**

हवामान खात्याच्या अंदाजानुसार, या कालावधीत काही ठिकाणी ५० ते ७० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता असून, समुद्रकिनारी आणि डोंगराळ भागांत विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. यासोबतच २६ व २७ मे रोजीदेखील वाऱ्याचा वेग ४० ते ६० किमी/तास इतका राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. २८ व २९ मेसाठी हवामान खात्याने ‘येलो अलर्ट’ दिला असून, या काळातही राज्यात पावसाचा जोर कायम राहण्याची चिन्हे आहेत.

२३ मे रोजी सकाळी ८.३० वाजता, दक्षिण कोकण किनारपट्टीजवळ पूर्व–मध्य अरबी समुद्रात कमी दाबाचे क्षेत्र सक्रिय झाले होते. पुढील २४ तासांत ते उत्तरेकडे सरकून अधिक तीव्र होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.




या हवामान बदलामुळे गोवा व परिसरात चक्रवातीय परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. हवामान खात्याच्या माहितीनुसार, केरळमध्ये नैऋत्य मोसमी पावसाच्या आगमनासाठी वातावरण अनुकूल असून, दक्षिण अरबी समुद्र, मालदीव, लक्षद्वीप, कोमोरिन क्षेत्र, कर्नाटक, तामिळनाडू, तसेच बंगालच्या उपसागरातील अनेक भागांमध्येही मान्सूनची वाटचाल वेग घेत आहे.

गेल्या तीन दिवसांच्या जोरदार पावसामुळे राज्यात अनेक ठिकाणी पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक व मालमत्ता नुकसान झाले आहे. झाडे उन्मळून पडणे, दरडी कोसळणे, जुनी इमारत कोसळणे अशा घटना सातत्याने घडत आहेत. शुक्रवारच्या पडझडीबाबत माहिती घेतली असतता, मडगाव पिंपळकट्टा परिसरात, धोकादायक इमारतीचा भाग कोसळल्याने तीन चारचाकी वाहनांचे नुकसान झाले. मांद्रेतील शेती क्षेत्रात, कापणीस तयार असलेल्या भातशेतीत गुडघाभर पाणी साचल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. मिरामार येथील कांपाल कॉलनीत, रस्त्यावर पाणी साचल्याने रस्ता खचल्याची घटना घडली. फार्मागुडी किल्ल्याजवळ, जलसाठ्यामुळे धोका निर्माण झाला आहे. ओडशेल – ताळगाव परिसरात, घरात माती वाहून येण्याचे प्रकार अद्याप सुरूच आहेत.

दरम्यान सांतइनेझ येथील आपटेश्वर गणपती मंदिराच्या मागील तलावात, शुक्रवारी सकाळी पाण्यात बुडालेल्या एका तरुणाचा मृत्यू झाला. स्थानिक तरुणाने बुडणाऱ्याला वाचवण्यासाठी उडी घेतली असता, तो स्वतः बुडाला. बुडणाऱ्या तरुणाला उपस्थितांनी वाचवले, मात्र मदतीस धावलेला युवक मृत झाला. सततच्या पावसामुळे राज्य प्रशासनाने नागरिकांना मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या असून, अनावश्यक प्रवास टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुढील काही दिवस गोव्यासाठी अत्यंत संवेदनशील ठरणार असून, नागरिकांनी सतर्कता बाळगणे आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करणे अत्यावश्यक आहे.

## ‘निकृष्ट कामाचा उत्कृष्ट नमुना’



मिरामार कांपाल कॉलनी येथे रस्त्याचा भाग खचला.
(छाया : उपेंद्र नाईक)

## ताळगाव प्रकरणी कारवाईसाठी ‘आप’ आक्रमक

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २३ :** ओडशेल चिखल भरण्यावरून झालेल्या ताळगाव येथील कथित हल्ला प्रकरणी आम आदमी पक्षाच्या (आप) शिष्टमंडळाने शुक्रवारी पणजी पोलिस निरीक्षक विजयकुमार चोडणकर यांची भेट घेतली. या हल्ल्यात सिसिल रॉड्रिग्ज यांना लक्ष्य करण्यात आल्याचा आरोप आहे. तक्रारीत ताळगावच्या आमदार जेनिफर मोन्सेरात यांच्यासह अन्य व्यक्तींविरुद्ध गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

उपराष्ट्रपतींच्या दौऱ्यामुळे तपास सुरू करता न आल्याचे चोडणकर यांनी स्पष्ट केले. प्रारंभी पोलिसांनी फक्त चार सदस्यांना भेटण्याची परवानगी दिली होती, मात्र ॲड. अमित पालेकर व आमदार क्रूझ सिल्वा यांनी संपूर्ण आठ जणांचे शिष्टमंडळ भेट देण्यावर जोर दिला. पोलिसांनी नंतर यास मंजुरी दिली.

ॲड. पालेकर यांनी सांगितले की, चोडणकर यांनी पुढील २४ तासांत कारवाई सुरू करण्याचे आश्वासन दिले असून, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणालाही याची माहिती देण्यात येणार आहे. पालेकरांनी टेकडीचे अतिक्रमण आणि बिल्डरकडून स्थानिकांना रोखण्याच्या प्रकारांकडे पोलिसांचे लक्ष वेधले. या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप असल्याचा आरोप त्यांनी केला. ते म्हणाले, सर्व पुरावे असूनही अद्याप साक्षीदारांचे जबाब नोंदवले गेले नाहीत. आम्ही ४८ तासांची मुदत देत आहोत, त्यानंतर पुढील पावले उचलू.

सिसिल रॉड्रिग्ज यांनी हल्ल्यानंतर २१ मे रोजी दाखल केलेल्या तक्रारीत आमदार मोन्सेरात, पंचायत सदस्य सिडनी बॅरेटो, बांधकाम व्यावसायिक सादिक शेख व मुधित गुप्ता यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. तक्रारीत गुन्हेगारी धमकी, विनयभंग आणि जीवितास धोका निर्माण करण्याचे आरोप नमूद आहेत.

पालेकरांनी स्पष्ट केले की, राज्यात सध्या दगडफेक करणारे राजकारण चालवत आहेत, आणि निवडून आलेल्या प्रतिनिधींनाही पोलिस स्टेशनमध्ये प्रवेश नाकारला जातो. कायदा फक्त विरोधकांसाठी आहे, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

## मडगावमध्ये सांडपाण्याची गंभीर समस्या

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २३ :** मान्सूनपूर्व पावसाने मडगाव शहरातील सांडपाणी व्यवस्थेच्या ढासळलेल्या परिस्थितीवर पुन्हा एकदा प्रकाश टाकला आहे. आर्लेम, फातोर्डा, आके –मडगाव आणि कोलवा या प्रमुख परिसरांमध्ये सांडपाणी ओसंडून रस्त्यांवर वाहत असल्याने अस्वच्छता आणि आरोग्याच्या धोक्याची स्थिती निर्माण झाली आहे.

सांडपाण्याचे पाणी रस्ते आणि पदपथांवर साचल्याने रहिवाशांनी जलजन्य रोग फैलावण्याची भीती व्यक्त केली आहे. या दुर्गंधीयुक्त व अस्वच्छ परिस्थितीमुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत असून संतप्त रहिवाशांनी प्रशासनाच्या उदासीनतेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

ही आता केवळ गैरसोय राहिलेली नाही, तर आरोग्याच्या दृष्टीने गंभीर धोका बनली आहे, असे फातोर्डा येथील एका स्थानिक रहिवाशाने सांगितले. आमच्या मुलांना शाळेत जाण्यासाठी सांडपाण्यातून चालावे लागते. दरवर्षी याच समस्येचा सामना करावा लागतो हे दुर्दैवी आहे , असे रहिवासी सांगत आहेत.

आर्लेम आणि आके परिसरात अनेक रस्त्यांवर सांडपाणी साचल्याने वाहनचालक, दुकानदार आणि पादचारी यांचे हाल सुरू आहेत. कोल्वा येथे परिस्थिती आणखी बिकट असून पर्यटनावरही प्रतिकूल परिणाम झाल्याचे स्थानिक दुकानदारांचे म्हणणे आहे. प्रत्येक पावसाळ्यात हीच स्थिती ओढवते. प्रशासनाकडून कोणतीही पूर्वतयारी होत नाही. नागरिकांनी त्यांचं दुर्लक्ष का सहन करावे? असा सवाल आर्लेममधील एका दुकानदाराने उपस्थित केला.

रहिवाशांनी आता मडगाव नगरपरिषद पान २ ▶




Carens Clavis
For epic journeys

Together isn't just a feeling. It's how we move. The new Carens Clavis brings that spirit to life by blending bold design with high ground clearance and spacious 3-row comfort. Advanced tech features like next-gen Kia Connect** with 80+ connected features, and ADAS# Level 2 with 20 autonomous features come together to make every drive safe, seamless and unforgettable. Because when you're with the ones who matter, every journey deserves to feel epic. Book now and get ready for your family's next epic journey.

Built Smart Styled for the family



Dual Pane Panoramic Sunroof | 67.62 cm (26.62”) Dual Panoramic Display Panel | ADAS Level 2 with 20 Autonomous Features | Ventilated Front Seats | Smart Pure Air Purifier with AQI Display | BOSE Premium Sound System with 8 Speakers

Robust 18 Hi – Safety Package (Standard across all variants)
• Front Dual Airbags • Front Seat Side Airbags • Side Curtain Airbags • ABS (Anti-lock Brake System) • BAS (Brake Assist System) • ESC (Electronic Stability Control) • VSM (Vehicle Stability Management) • HAC (Hill-start Assist Control) • ESS (Emergency Stop Signal) • DBC (Downhill Brake Control) • Highline Tyre Pressure Monitor • Rear Parking Sensors • Speed Sensing Auto Door Lock • Impact Sensing Auto Door Unlock • All Seats 3-Point Seat Belts with Reminder • ISOFIX • Rear Occupant Alert • All Wheel Disc Brakes

Kia Service
Connected • Adaptive • Responsive • Engage

Introducing My Convenience Secure^: Option to cover your car’s wear and tear parts for up to 3 years from date of delivery.

3 Years Unlimited km Warranty | Extended Warranty^^ Up to 5 Years | Scratch Care Program°° | IoT Based Smart Services`` | 24x7 | 3 Years Nationwide RSA°

Terms & Conditions Apply. *Ex-showroom price all India. **Kia Connect comes with 3 years free subscription. Amazon Alexa and any handheld device, mobile phone or/and smartwatch device are not standard car accessory & the customer needs to purchase from a third party. Kia Connect features may vary depending on the variant, device compatibility, software and network availability in the both vehicle and Alexa device. Kia Connect skill is only available in India and can be interacted with in English and Hindi. #Advanced Driver Assistance System (ADAS) is not a substitute for human eye and driver vigilance. It is an assistance feature that enhances driving experience and safety. Effectiveness of ADAS may vary based on actual situation and all objects around vehicle may not be detected. The driver shall remain responsible for safe, vigilant, and attentive driving. ^My Convenience Secure available with My Convenience/ My Convenience Plus at the time of sales at additional cost, covers wear and tear of selected parts only. °°Scratch Care Program coverage includes repair of 1 scratch free of cost in an ownership period of 12 months from the date of sale, applicable on the new Carens Clavis retailed up to 31st August 2025. ``IoT based workshops for live vehicle tracking for digital experience. ^^3 Years standard warranty and 2 years extended warranty. °RSA coverage across India except Andaman & Nicobar Islands and Lakshadweep. The product & feature images shown in this brochure is for representation purpose only. Features and specifications as shown may not be part of standard fitment and may vary. The colors shown are subject to availability and may not be available across all variants and may differ slightly from those shown in this brochure. The specifications and features may vary depending on models/ variants. Kia India Pvt. Ltd. (Formerly known as Kia Motors India Private Limited) reserves the right to make any changes with respect to the trims, colors, specifications, Kia Connect features and other details of any model as mentioned in this brochure or to discontinue any model without prior notice. For more details visit your local Kia dealership. Kia India Pvt. Ltd. urges you to follow traffic rules, these are meant to keep you safe on roads. We do not endorse vandalism or illegal activities related to road safety. Safety is a top priority, and we urge responsible behavior regarding traffic regulations and road safety.

FOR INFORMATION CONTACT: GOA: AUTOMOTIVEIS DE CRISTAL KIA, VERNA, PH: 7719816666, MAPUSA NORTH GOA, PH: 9172415444, MARGAO, PH: 8956768940

INNOCEAN-034/25